# मराठवाडा विभागातील तुती लागवडीखालील क्षेत्राचा जिल्हानिहाय तुलनात्मक अभ्यास

**मोतीसिंग सुंदरसिंग ठाकूर**
संशोधक

**प्रस्तावनाः**

अर्थव्यवस्थेचा सर्वसमावेशक विकास हा कृषी क्षेत्रावर अवलंबून असतो. कृषीक्षेत्राची प्रगती ही आर्थिक विकासाची पहिली पायरी मानली जाते. जगामध्ये सर्वच देशांनी कृषी क्षेत्राच्या विकासातून आपला विकासाचा पुढचा टप्पा गाठल्याचे दिसून येते. 'कृषी ही राष्ट्राच्या संपत्तीचा स्त्रोत आहे व कृषी क्षेत्रातील अधिक्य हे राष्ट्राच्या विकासासाठी अनुकूल गोष्ट आहे' कृषी क्षेत्र अर्थव्यवस्थेच्या सर्वांगिण विकासासाठी अनेक पातळयावर धनात्मक कार्य करत असते. 'मानवाच्या सांस्कृतिक, आर्थिक, नैतिक व ऐहिक विकासाचा पाया कृषी क्षेत्र आहे'

कृषी व्यवसायाभोवती राष्ट्राची केवळ अर्थव्यवस्था वा उपजीविका गुंफलेल्या आहेत, असे नाही तर मानवाची जीवन पध्दती, संस्कृती व सांस्कृतिक कार्य देखील शेतीवरच अवलंबून आहेत. विल्सन, बार्कर व बारसोडी यांच्या मते, 'कृषी हे अर्थव्यवस्थेचे मूलभूत क्षेत्र आहे,'. विकास आणि रोजगार या दोन्ही बाबी कृषी क्षेत्राशी निगडीत आहेत. दीर्घकालीन आर्थिक विकासात सातत्य व अखंडता राहण्याच्या दृष्टीने कृषीक्षेत्राला वेगळे स्थान आहे. प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ गुन्नर मिर्डाल यांच्या मते, दीर्घकालीन आर्थिक विकासाचा लढा फक्त कृषी क्षेत्राद्वारेच जिंकला किंवा हरला जावू शकतो. यावरून आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचे स्थान अंत्यत महत्त्वाचे असल्याचे लक्षात येते.

'आजही बहूसंख्य भारतीय लोकांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन शेती आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ६९ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते.' त्यांचा मुख्य व्यवसाय शेतीच आहे. कृषी व्यवसायाभोवती भारताची अर्थव्यवस्था आणि लोकांची उपजीविका अवलंबून आहे. तसेच भारतीयांची जीवन पध्दती, संस्कृती देखील शेतीवरच अवलंबून असल्याचे दिसून येते. म्हणूनच शेतीक्षेत्रास भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हटले जाते. विल्सन, बार्कर व बारसोडी यांच्या मते, 'कृषी हे अर्थव्यवस्थेचे मूलभूत क्षेत्र आहे'. भारतीय अर्थव्यवस्थेतील शेती क्षेत्राचे महत्त्व स्पष्ट करण्यासाठी महात्मा गांधीनी 'भारतीय शेती ही भारतीय लोकांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन असून शेती हा भारताचा आत्मा आहे,' असे म्हटले होते.

भारतात रेशीम उद्योग फार पुरातन काळापासून चालू आहे. रामायण, महाभारत या प्राचीन संस्कृत ग्रंथांत रेशीमचा उल्लेख कौशिकम् (कोषापासून तयार करण्यात आलेले) असा केलेला आढळून येतो. त्यावेळी भारत रेशीम वस्त्रांची निर्यात युरोप, मध्यपूर्व आशिया, इजिप्त या देशात प्रामुख्याने करत होता. भारतीय रेशीम वस्त्रांसाठी जागतीक पातळीवर मोठी मागणी होती.

भरतकाम, विणकाम ही त्यावेळी भारताची एक महत्त्वाची कला होती. भारतीय कारागीर त्यात खूप कुशल होते. त्यातील कला मात्र पिढ्यान पिढ्या कुटुंबात चालूच राहिली. त्यावेळी रेशीम उद्योगाला राजाश्रय मिळाल्याने या उद्योगास स्थैर्य व प्रगती प्राप्त झाल्याचे लक्षात येते. आज ही बंगालची साडी, काश्मीर, म्हैसूर येथील रेशीम आणि सुरतेचे रेशीमवरील जरीकाम व कलाकुसर काम जगप्रसिद्ध आहे.

महाराष्ट्रात विदर्भ व मराठवाडा विभागात दिवसेंदिवस पावसाचे प्रमाण कमी होत आहे. महत्त्वाचे म्हणजे पावसाच्या सरासरी दिवसाचे प्रमाण कमी होत आहे . पावसा बाबत अनिश्चिता वाढत आहे. अशा परिस्थितीत या विभागात पावसाळी हंगामात जिरायती क्षेत्रावर म्हणजे कृत्रिम सिंचनाची सुविधा उपलब्ध नाही. अशा शेतजमीनीवर रेशीम शेती करण्यासाठी आजही फारसे संशोधन झाल्याचे दिसून येत नाही. म्हणून **मराठवाडा विभागातील तुती लागवडीखालील क्षेत्राचे जिल्हानिहाय तुलनात्मक अभ्यास** या संशोधन लेखाचा प्रयत्न.

## संशोधनाची उद्दिष्टे:

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उद्दिष्टे निर्धारीत करण्यात आली आहेत.

१. मराठवाडा विभागातील तुती लागवड क्षेत्र याचे अध्ययन करणे.

२. मराठवाड्यातील जिल्हानिहाय कोष उत्पादनाचा अभ्यास करणे.

## मराठवाड्यातील जिल्हानिहाय तुती लागवड क्षेत्र

**तक्ता क्र. १ .१**

**मराठवाड्यातील जिल्हानिहाय तुती लागवड क्षेत्र**
**(वर्ष: २००६-२००७ ते २०१९-२०२०)** (क्षेत्र एकरमध्ये)

| वर्ष | औरंगाबाद | जालना | बीड | लातूर | उस्मानाबाद | नांदेड | परभणी | हिंगोली | एकूण मराठवाडा विभाग | झालेली वाढ/घट | वार्षिक वृध्दी दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २००६-०७ | २४४.५० (१४.१७) | ३३८.०० (१९.५९) | ३७५.०० (२१.७४) | १५७.०० (९.१०) | २२८.५० (१३.२५) | १६०.०० (९.२८) | २२२.०० (१२.८७) | -- | १७२५.०० (१००.००) | - | - |
| २००७-०८ | १३१.०० (४.२७) | ५७६.५० (१८.७८) | ८३६.०० (२७.२४) | २१४.५० (६.९९) | ४३१.०० (१४.०४) | २५२.०० (८.२१) | ३२७.०० (१०.६५) | ३०१.०० (९.८१) | ३०६९.०० (१००.००) | १३४४ | ७७.९१ |
| २००८-०९ | १०५.५० (३.८२) | ६५२.०० (२३.६१) | ५२२.०० (१८.९०) | २५९.०० (९.३८) | ६५९.०० (२३.८६) | १६४.०० (५.९४) | १७४.५० (६.३२) | २२६.०० (८.१८) | २७६२.०० (१००.००) | -३०७ | -१०.०० |
| २००९-१० | ८८.०० (३.२७) | ७२७.०० (२७.०१) | ६८६.०० (२५.४८) | २४३.५० (९.०५) | ३८०.०० (१४.१२) | ३९६.०० (१४.७१) | ११२.५० (४.१८) | ५९.२० (२.२०) | २६९२.२० (१००.००) | -६९.८ | -२.५३ |
| २०१०- | १३.०० | ५०५.०० | ६०७.०० | ११४.५० | ४९१.०० | १५३.०० | १००.०० | ४१.२० | २०२४.७० | -६६७.५ | -२४.७९ |

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

| वर्ष | औरंगाबाद | जालना | बीड | लातूर | उस्मानाबाद | नांदेड | परभणी | हिंगोली | एकूण मराठवाडा विभाग | झालेली वाढ/घट | वार्षिक वृध्दी दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | (०.६४) | (२४.९४) | (२९.९८) | (५.६५) | (२४.२५) | (७.५६) | (४.९४) | (२.०३) | (१००.००) | | |
| २०११-१२ | १३५.५० (६.८०) | २७४.०० (१३.७५) | ७२४.५० (३६.३५) | १३०.०० (६.५२) | ४२४.०० (२१.२७) | १६२.०० (८.१३) | ९६.५० (४.८४) | ४६.०० (२.३१) | १९९२.५० (१००.००) | -३२.२ | -१.५९ |
| २०१२-१३ | १८४.५० (१२.४८) | २२५.५० (१५.२६) | ३८३.०० (२५.९१) | १६०.०० (१०.८३) | ७६.०० (५.१४) | २०६.०० (१३.९४) | १३४.५० (९.१०) | १०८.५० (७.३४) | १४७८.०० (१००.००) | -५१४.५ | -२५.८२ |
| २०१३-१४ | २०७.०० (१४.७८) | ३१३.०० (२२.३४) | २६५.०० (१८.९२) | १३९.५० (९.९६) | ८०.०० (५.७१) | १७७.०० (१२.६३) | १२७.७५ (९.१२) | ९२.०० (६.५७) | १४०१.२५ (१००.००) | -७६.७५ | -५.१९ |
| २०१४-१५ | ५५६.५० (१७.१५) | ८३२.०० (२५.६५) | ६७०.०० (२०.६५) | २८३.०० (८.७२) | १६८.०० (५.१८) | ३२७.०० (१०.०८) | २२७.२५ (७.०१) | १८०.५० (५.५६) | ३२४४.२५ (१००.००) | १८४३ | १३१.५३ |
| २०१५-१६ | ६९३.५० (१५.३३) | १३७१.५० (३०.३२) | ९९२.०० (२१.९३) | २७०.५० (५.९८) | २०५.०० (४.५३) | ४०९.०० (९.०४) | ३४७.०० (७.६७) | २३४.७५ (५.१७) | ४५२३.२५ (१००.००) | १२७९ | ३९.४२ |
| २०१६-१७ | ६१८.८० (१४.२१) | ९३९.०० (२१.५७) | ८९५.०० (२०.५६) | ३३२.५० (७.६४) | ७११.०० (१६.३३) | ३२८.०० (७.५३) | ३८६.४५ (८.८८) | १४३.०० (३.२८) | ४३५३.७५ (१००.००) | -१६९.५ | -३.७५ |
| २०१७-१८ | ७०५.०० (१३.८३) | ७२४.०० (१४.२०) | ११५८.०० (२२.७१) | ६४२.०० (१२.५९) | ७१९.०० (१४.१०) | ३४१.०० (६.६९) | ४९४.०० (९.६९) | ३१५.५० (६.१९) | ५०९८.५० (१००.००) | ७४४.७५ | १७.११ |
| २०१८-१९ | २०२२.०० (२१.००) | १५३७.०० (१५.९७) | २०९४.०० (२१.७५) | १०५२.०० (१०.९३) | १९९.०० (२.०७) | ८३३.०० (८.६५) | ९५२.०० (९.८९) | ९३८.०० (९.७४) | ९६२७.०० (१००.००) | ४५२८.५ | ८८.८२ |
| २०१९-२० | १७००.०० (१६.३४) | १०७६.०० (१०.३४) | २६०३.०० (२५.०१) | ७८४.५० (७.५४) | १७३१.५० (१६.६४) | ९६५.०० (९.२७) | ८८२.०० (८.४८) | ६६४.०० (६.३८) | १०४०६.०० (१००.००) | ७७९ | ८.०९२ |
| **एकूण** | ७४०४.८० (१३.६१) | १००९०.५० (१८.५५) | १२८१०.५० (२३.५५) | ४७८२.५० (८.७९) | ६५०३.०० (११.९५) | ४८७३ (८.९६) | ४५८३.४५ (८.४३) | ३३४९.६५ (६.१६) | ५४३९७.४० (१००.००) | - | - |

**टीपः** कंसातील आकडे मराठवाड्यातील एकूणाशी प्रतिशत प्रमाण दर्शवितात.

**स्त्रोतः** महाराष्ट्रातील जिल्हा रेशीम कार्यालये व रेशीम संचालनालय, नागपूर.

तक्ता क्र.१.१ वरून असे दिसून येते की, सन २००६-०७ ते २०१९-२०२० या १४ वर्षाच्या संशोधन कालावधीमध्ये मराठवाडा विभागात तुती लागवडीखालील एकूण क्षेत्र ५४३९७.४० एकर आहे. याचा अर्थ मराठवाडा विभागात संशोधन कालावधीमध्ये दरवर्षी सरासरी ३८८५.५३ एकर क्षेत्रावर तुती लागवड झाली. मराठवाडा विभागातील तुती लागवडीखालील क्षेत्राचा जिल्हानिहाय तुलनात्मक अभ्यास केला असता असे लक्षात येते की, सर्वाधिक तुती लागवडी खालील क्षेत्र बीड जिल्ह्यात (२३.५५ टक्के) आहे. तर सर्वात कमी तुती लागवडी खालील

क्षेत्र हिंगोली जिल्ह्यात (६.१६ टक्के) आहे. उर्वरित मराठवाड्यातील तुती लागवडीखालील क्षेत्राचा जिल्हानिहाय अभ्यास करता असे दिसून येते की, जालना (१८.५५ टक्के) आणि उस्मानाबाद जिल्ह्यात (११.९५ टक्के) तुती लागवडीखालील क्षेत्र ब-यापैकी दिसून येते तर तुलनेने नांदेड (८.९६ टक्के), लातूर (८.७९ टक्के) आणि परभणी (८.७९ टक्के) या जिल्ह्यात तुती लागवडी खालील क्षेत्र कमी आहे.

तक्ता क्र. ४.१ वरुन, सन २००६-०७ ते २०१९-२० या १४ वर्षाच्या संशोधन कालावधीत मराठवाड्यातील तुती लागवड क्षेत्रात झालेल्या वाढ व घटीचा अभ्यास करता असे लक्षात येते की, सन २००७-०८, २०१४-१५, २०१५-१६, २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० या सहा वर्षात तुती लागवड क्षेत्रात वाढ झाली आहे. यात सर्वाधिक वाढ सन २०१८-१९ या वर्षी ४५२८.५ एकर एवढी झाली आहे. तर सर्वात कमी वाढ सन २०१९-२० या वर्षी ७७९ एवढी झाली आहे. तर २००८-०९, २००९-१०, २०१०-११, २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४ आणि २०१६-१७ या सात वर्षात तुती लागवड क्षेत्रात घट झाली आहे. यात सर्वाधिक घट सन २०१०-११ या वर्षी -६६७.५ एकर एवढी झाली आहे.

मराठवाड्यातील तुती लागवड क्षेत्राच्या वार्षिक वृध्दी दराचा अभ्यास करता असे लक्षात येते की, सर्वाधिक प्रतिशत वार्षिक वृध्दी दर सन २०१४-१५ मध्ये १३१.५३ प्रतिशत एवढा आहे तर सर्वात कमी सन २०१२-१३ मध्ये -२५.८२ प्रतिशत एवढा आहे. मराठवाड्यातील तुती लागवडीखालील क्षेत्रांमध्ये जिल्हानिहाय असंतुलन दिसून येते. मराठवाड्यात तुती लागवडी खालील क्षेत्रात वाढ करणे शक्य आहे. तुती क्षेत्रात वाढ होण्यासाठी मोठ्याप्रमाणात प्रयत्न करण्याची गरज आहे. तुती लागवडीतून शेतकरी आपल्या शेतावर रोजगार निर्माण करु शकतो. तसेच रेशीम निर्मितीसाठी अळयांना मुबलक प्रमाणात तुती पाल्याची गरज असते. महाराष्ट्राचे तापमान तुती झाडांच्या वाढीसाठी योग्य असून अशा हवामानात तुती पाल्याची जोमदार वाढ होते व पाल्याचे पर्याप्त उत्पन्न घेता येते.

रेशीम शेतीतून शेतक-यांना शाश्वत उत्पन्नाचा मार्ग मिळतो. आज बागायती व कोरडवाहू शेतीत तुतीचा भरपूर पाला उत्पादन देणा-या संकरीत जातींचा देशातील वेगवेगळया संशोधन केंद्रावर विकास केला आहे. या संकरीत वाणांचा वापर करुन शेतकरी आपल्या शेतीमध्ये चांगल्या प्रकारे रेशीम शेती करु शकतो. विशेषतः तुती झाडांची लागवड करुन अल्पभूधारक व जिरायती शेतकरी रेशीम शेती करु शकतो. महत्त्वाचे म्हणजे गरजेनुसार पावसाळी हंगामात सोयाबीन, गहू, मुग, इत्यादी. अंतर पिके देखील घेऊ शकतो. याद्वारे शेतकरी आपल्या उत्पन्नात वाढ करु शकतात.

मराठवाड्यातील जिल्हानिहाय कोष उत्पादन

तक्ता क्र. १ . २

मराठवाड्यातील जिल्हानिहाय कोष उत्पादन

(वर्ष: २००६-२००७ ते २०१९-२०२०) (मे. टनमध्ये)

| वर्ष | औरंगाबाद | जालना | बीड | लातूर | उस्मानाबाद | नांदेड | परभणी | हिंगोली | एकूण मराठवाडा विभाग | झालेली वाढ/ घट | प्रतिशत वार्षिक वृध्दी दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २००६-०७ | ९.७६ | १५.३३ | ५८.०० | १९.३० | ११.२८ | २.६६ | ७.७६ | --उना-- | १२४.०९ | -- | -- |
| | (७.८६) | (१२.३५) | (४६.७४) | (१५.५५) | (९.०९) | (२.१४) | (६.२५) | | (१००.००) | | |
| २००७-०८ | ५.८६ | ४१.२४ | १०७.३५ | २१.०८ | ३३.०५ | ८.४३ | १०.०३ | २४.१९ | २५१.२३ | १२७.१४ | १०२.४६ |
| | (२.३३) | (१६.४२) | (४२.७३) | (८.३९) | (१३.१६) | (३.३६) | (३.९९) | (९.६३) | (१००.०१) | | |
| २००८-०९ | ४.३१ | ५६.३९ | १४१.९९ | २४.४० | ६१.११ | १६.८० | १०.४५ | १२.१४ | ३२७.५९ | ७६.३६ | ३०.३९ |
| | (१.३२) | (१७.२१) | (४३.३४) | (७.४५) | (१८.६५) | (५.१३) | (३.१९) | (३.७१) | (१००.००) | | |
| २००९-१० | ३.८६ | ७४.५७ | १३९.६७ | २२.३२ | ७६.३८ | २०.२५ | १२.३५ | ४.७२ | ३५४.१२ | २६.५३ | ८.०९९ |
| | (१.०९) | (२१.०६) | (३९.४४) | (६.३०) | (२१.५७) | (५.७२) | (३.४९) | (१.३३) | (१००.००) | | |
| २०१०-११ | २.१० | ७६.९९ | १३५.५० | १९.०३ | ६९.५५ | १५.७२ | ११.५७ | ३२.९८ | ३६३.४४ | ९.३२ | २.६३ |
| | (०.५८) | (२१.१९) | (३७.२९) | (५.२४) | (१९.१४) | (४.३३) | (३.१८) | (९.०८) | (१००.०१) | | |
| २०११-१२ | ११.९० | ७१.५४ | १२०.०० | १६.०० | ४७.१३ | २२.९० | ११.५७ | ३६.६७ | ३३७.७१ | -२५.७३ | -७.०८ |
| | (३.५२) | (२१.१८) | (३५.५३) | (४.७३) | (१३.९६) | (६.७८) | (३.४३) | (१०.८६) | (१००.००) | | |
| २०१२-१३ | २०.१२ | ४३.४८ | ७४.४५ | २२.६१ | १९.५४ | २७.३७ | १७.३१ | १५.६३ | २४०.५१ | -९७.२ | -२८.७८ |
| | (८.३७) | (१८.०८) | (३०.९६) | (९.४०) | (८.१२) | (११.३८) | (७.२०) | (६.५०) | (१००.००) | | |
| २०१३-१४ | ३६.२१ | ६८.५५ | ८२.३५ | ३०.५१ | २५.७४ | २८.४२ | २६.३४ | १४.८३ | ३१२.९५ | ७२.४४ | ३०.१२ |
| | (११.५७) | (२१.९०) | (२६.३१) | (९.७५) | (८.२२) | (९.०८) | (८.४२) | (४.७४) | (१००.००) | | |
| २०१४-१५ | ८१.२२ | १४५.८७ | १६३.७२ | ४९.५९ | ७४.४२ | ८७.५४ | ४८.०६ | ३०.६८ | ६८१.१० | ३६८.१५ | ११७.६४ |
| | (११.९२) | (२१.४२) | (२४.०४) | (७.२८) | (१०.९३) | (१२.८५) | (७.०६) | (४.५०) | (१००.००) | | |
| २०१५-१६ | ११६.५७ | २१२.६४ | १६६.५० | ३१.७५ | ८०.६८ | ८१.२९ | ४१.४७ | ४३.७० | ७७४.६० | ९३.५ | १३.७३ |
| | (१५.०५) | (२७.४५) | (२१.४९) | (४.१०) | (१०.४२) | (१०.४९) | (५.३५) | (५.६४) | (१००.००) | | |
| २०१६-१७ | ९५.०४ | १९९.५२ | १५५.०० | ३१.५० | ७४.६० | ४२.४१ | ५३.८६ | ३१.५० | ८३.४३ | -९१.१७ | -११.७७ |
| | (१३.९१) | (२९.२०) | (२२.६८) | (४.६१) | (१०.९२) | (६.२१) | (७.८८) | (४.६१) | (१००.००) | | |
| २०१७-१८ | ११३.२४ | २४७.०० | ३३४.५५ | ७०.३८ | १९८.४० | ८५.०३ | ७९.३५ | ७०.०७ | ११९८.०२ | ५१४.५९ | ७५.३० |
| | (९.४५) | (२०.६२) | (२७.९३) | (५.८७) | (१६.५६) | (७.१०) | (६.६२) | (५.८५) | (१००.००) | | |
| २०१८-१९ | १३५.४० | २४३.२३ | ३६८.४० | १३८.३७ | ४०१.२० | १५.७० | २५२.७७ | १०६.०१ | १६६१.०८ | ४६३.०६ | ३८.६५ |
| | (८.१५) | (१४.६४) | (२२.१८) | (८.३३) | (२४.१५) | (०.९५) | (१५.२२) | (६.३८) | (१००.००) | | |

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

| वर्ष | औरंगाबाद | जालना | बीड | लातूर | उस्मानाबाद | नांदेड | परभणी | हिंगोली | एकूण मराठवाडा विभाग | झालेली वाढ/ घट | प्रतिशत वार्षिक वृध्दी दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९-२० | १४६.७५ | १६६.२३ | ५३२.९६ | ११६.५५ | ३२७.१३ | ९२.०० | १६७.५० | ७४.५५ | १६२३.६७ | -३७.४१ | -२.२५ |
| | (९.०४) | (१०.२४) | (३२.८२) | (७.१८) | (२०.१४) | (५.६७) | (१०.३१) | (४.५९) | (१००.००) | | |
| **एकूण** | ७८२.३४ | १६६२.५८ | २५८०.४४ | ६१३.३९ | १५००.२१ | ५४६.५२ | ७५०.३९ | ४९७.६७ | ८३३३.५३ | -- | -- |
| | (८.७६) | (१८.६१) | (२८.८८) | (६.८७) | (१६.७९) | (६.१२) | (८.४०) | (५.५७) | (१००.००) | | |

**टीपः** कंसातील आकडे मराठवाड्यातील एकूणाशी प्रतिशत प्रमाण दर्शवितात.

**स्त्रोतः** महाराष्ट्रातील जिल्हा रेशीम कार्यालये व रेशीम संचालनालय, नागपूर.

तक्ता क्र.१.२ वरून असे लक्षात येते की, सन २००६-०७ ते २०१९-२०२० या १४ वर्षाच्या कालावधीमध्ये मराठवाडा विभागात एकूण कोष उत्पादन ८३३३.५३ मेट्रिक टन एवढे झाल्याचे दिसून येते. म्हणजे वरील कालावधीत मराठवाडा विभागात दरवर्षी सरासरी कोष उत्पादन ६३८.११ मेट्रिक टन एवढे झाले आहे. मराठवाडा विभागातील कोष उत्पादनाचा जिल्हानिहाय अभ्यास करता असे लक्षात येते की, मराठवाड्यात सर्वाधिक कोष उत्पादन बीड जिल्ह्यात (२८.८८ टक्के) झाले आहे तर सर्वात कमी कोष उत्पादन हिंगोली जिल्ह्यात (५.५७ टक्के) झाले आहे. उर्वरित मराठवाड्यातील जिल्हानिहाय कोष उत्पादन स्थितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, तुलनात्मक दृष्ट्या जालना (१८.६१ टक्के), उस्मानाबाद जिल्ह्यात (१६.७९ टक्के) कोष उत्पादनाची स्थिती चांगली आहे. तर परभणी (८.४० टक्के), लातूर जिल्ह्यात (६.८७ टक्के) कोष उत्पादनाचा पुरवठा कमी आहे.

तक्ता क्र. ४.४ वरुन, सन २००६-०७ ते २०१९-२० या १४ वर्षाच्या संशोधन कालावधीत मराठवाड्यातील कोष उत्पादनामध्ये झालेल्या वाढ व घटीचा अभ्यास करता असे लक्षात येते की, सन २००७-०८, २००८-०९, २००९-१०, २०१०-११, २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६, २०१७-१८ आणि २०१८-१९ या नऊ वर्षात वाढ झाली आहे. यात सर्वाधिक वाढ सन २०१७-१८ या वर्षी ५१४.५९ मे. टन एवढी झाली आहे तर सर्वात कमी वाढ सन २०१०-११ या वर्षी ९.३२ मे. टन एवढी झाली आहे. संशोधन कालावधीत २०११-१२, २०१२-१३, २०१६-१७ आणि २०१९-२० या चार वर्षात कोष उत्पादनामध्ये घट झाली आहे. यात सर्वाधिक घट सन २०१६-१७ या वर्षी रु.९१.१७ मे. टन एवढी झाली आहे तर सर्वात कमी घट सन २०११-१२ या वर्षी रु.२५.७३ मे. टन एवढी झाली आहे.

## निष्कर्ष

१) सन २००६-०७ ते २०१९-२०२० या १४ वर्षाच्या संशोधन कालावधीमध्ये मराठवाडा विभागात तुती लागवडीखालील एकूण क्षेत्र ५४३९७.४० एकर आहे. याचा अर्थ मराठवाडा विभागात संशोधन कालावधीमध्ये दरवर्षी सरासरी ३८८५.५३ एकर क्षेत्रावर तुती लागवड झाली.

२) मराठवाडा विभागातील तुती लागवडीखालील क्षेत्राचा जिल्हानिहाय तुलनात्मक अभ्यास केला असता असे लक्षात येते की, सर्वाधिक तुती लागवडी खालील क्षेत्र बीड जिल्ह्यात (२३.५५ टक्के) आहे. तर सर्वात कमी तुती लागवडी खालील क्षेत्र हिंगोली जिल्ह्यात (६.१६ टक्के) आहे. उर्वरित मराठवाड्यातील तुती लागवडीखालील क्षेत्राचा जिल्हानिहाय अभ्यास करता असे दिसून येते की, जालना (१८.५५ टक्के) आणि उस्मानाबाद जिल्ह्यात (११.९५ टक्के) तुती लागवडीखालील क्षेत्र ब-यापैकी दिसून येते तर तुलनेने नांदेड (८.९६ टक्के), लातूर (८.७९ टक्के) आणि परभणी (८.७९ टक्के) या जिल्ह्यात तुती लागवडी खालील क्षेत्र कमी आहे.

३) सन २००६-०७ ते २०१९-२० या १४ वर्षाच्या संशोधन कालावधीत मराठवाड्यातील तुती लागवड क्षेत्रात झालेल्या वाढ व घटीचा अभ्यास करता असे लक्षात येते की, सन २००७-०८, २०१४-१५, २०१५-१६, २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० या सहा वर्षात तुती लागवड क्षेत्रात वाढ झाली आहे. यात सर्वाधिक वाढ सन २०१८-१९ या वर्षी ४५२८.५ एकर एवढी झाली आहे. तर सर्वात कमी वाढ सन २०१९-२० या वर्षी ७७९ एवढी झाली आहे. तर २००८-०९, २००९-१०, २०१०-११, २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४ आणि २०१६-१७ या सात वर्षात तुती लागवड क्षेत्रात घट झाली आहे. यात सर्वाधिक घट सन २०१०-११ या वर्षी -६६७.५ एकर एवढी झाली आहे.

४) मराठवाड्यातील तुती लागवड क्षेत्राच्या वार्षिक वृध्दी दराचा अभ्यास करता असे लक्षात येते की, सर्वाधिक प्रतिशत वार्षिक वृध्दी दर सन २०१४-१५ मध्ये १३१.५३ प्रतिशत एवढा आहे तर सर्वात कमी सन २०१२-१३ मध्ये -२५.८२ प्रतिशत एवढा आहे.

५) सन २००६-०७ ते २०१९-२०२० या १४ वर्षाच्या कालावधीमध्ये मराठवाडा विभागात एकूण कोष उत्पादन ८३३३.५३ मेट्रिक टन एवढे झाल्याचे दिसून येते. म्हणजे वरील कालावधीत मराठवाडा विभागात दरवर्षी सरासरी कोष उत्पादन ६३८.११ मेट्रिक टन एवढे झाले आहे.

६) मराठवाडा विभागातील कोष उत्पादनाचा जिल्हानिहाय अभ्यास करता असे लक्षात येते की, मराठवाड्यात सर्वाधिक कोष उत्पादन बीड जिल्ह्यात (२८.८८ टक्के) झाले आहे तर

सर्वात कमी कोष उत्पादन हिंगोली जिल्ह्यात (५.५७ टक्के) झाले आहे. उर्वरित मराठवाड्यातील जिल्हानिहाय कोष उत्पादन स्थितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, तुलनात्मक दृष्ट्या जालना (१८.६१ टक्के), उस्मानाबाद जिल्ह्यात (१६.७९ टक्के) कोष उत्पादनाची स्थिती चांगली आहे. तर परभणी (८.४० टक्के), लातूर जिल्ह्यात (६.८७ टक्के) कोष उत्पादनाचा पुरवठा कमी आहे.

७) सन २००६-०७ ते २०१९-२० या १४ वर्षाच्या कालावधीत मराठवाड्यातील कोष उत्पादनामध्ये झालेल्या वाढ व घटीचा अभ्यास करता असे लक्षात येते की, सन २००७-०८, २००८-०९, २००९-१०, २०१०-११, २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६, २०१७-१८ आणि २०१८-१९ या नऊ वर्षात वाढ झाली आहे. यात सर्वाधिक वाढ सन २०१७-१८ या वर्षी ५१४.५९ मे. टन एवढी झाली आहे तर सर्वात कमी वाढ सन २०१०-११ या वर्षी ९.३२ मे. टन एवढी झाली आहे.

**शिफारशी**

१) सुशिक्षित तरूणांनी एकत्र येऊन रेशीम उद्योग केल्यास त्यांची निश्चितच स्वयंरोजगार निर्मितीसह अर्थिक उन्नती होईल. कोष व कच्चे रेशीम बाजार पेठ निर्माण केल्यास अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते. यासाठी शासकीय पातळीवर अधिक प्रयत्न होण्याची गरज आहे

२) ग्रामीण भागातील शेतमजूर आणि शेतक-यांना शाश्वत रोजगार व उत्पन्नाचे साधन निर्माण करण्यासाठी शासनाने रेशीम शेतीचा अधिक विस्तार करावा.

३) शेतकरी सातत्याने प्रचंड अडचणीत असल्याचा दिसून येतो. आज मराठवाड्यातील शेतीचा शाश्वत विकास करण्यासाठी रेशीम शेती हा एक उत्तम पर्याय आहे.

४ ) रेशीम उद्योगाचा विकास करण्यासाठी केंद्र पुरस्कृत योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. यासाठी राज्यशासनाने प्रयत्न करावेत.

५ ) पडिक जमिनीत तुती लागवड करण्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करावेत. यासाठी अधिक अनुदानाची तरतूद करावी.

**संदर्भ सूची:**

१. प्रा. मुकुंद गायकवाडः शेती विकास काल-आज-उद्या, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, २००३,

२. कविमंडन विजयः कृषी अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९६,

| | | |
|---|---|---|
| ३. | डॉ. दत्ताजीराव साळुंके | कृषी उद्योग आणि ग्रामीण विकास, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, अहमदनगर, पृ.क्र. १ |
| ४. | रविंद्र जोशीः | कृषी पंढरी योजना- एक सर्वेक्षण, अर्थसंवाद, एप्रिल-जून १९८७. |
| ५. | अतुल देऊळगावकरः | स्वामीनाथन भूकमुक्तीचा ध्यास, अक्षर प्रकाशन, मुंबई. पृ.क्र. १६१ |
| ६. | विजय कविमंडन | कृषी अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकशन, नागपूर, १९९६, |
| ७. | गंगाधर वि. कायंदेः | शेतीचे अर्थशास्त्रः सिध्दांत आणि धोरणे, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक, २००७. |
| ८. | मधुरा स्वामीमाथनः | अन्नसुरक्षा कायद्याची अंमलबजावणी, योजना मासिक. |